दिव्य मराठी
धाराशिव जिल्हा 15

# प्रतीक्षाचा राज्यपालांच्या हस्ते गौरव

प्रतिनिधी | उमरगा

सायबर गुन्हेगारीबद्दल जनजागृतीसाठी राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर 'शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम लातूरसह धाराशिव, सोलापूर, परभणी जिल्ह्यातील शाळा, कॉलेज व समाजातील अनेक घटकातील नागरिकांसाठी राबविण्यात आला.

या कार्यासाठी महाविद्यालय क्विक हिल फॉउंडेशनचा स्मार्ट सायबर क्लब रनर अप-एक व बीएससी तृतीय वर्षातील प्रतीक्षा रमेश पांगे या विद्यार्थिनीला बेस्ट सेक्रेटरी रनर अप-२ हा पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी डीआयजी संजय शिंत्रे, महाराष्ट्र सायबर, क्विक हिल फाउंडेशन अध्यक्ष अनुपमा काटकर उपस्थित होते. प्रा ज्योती माशाळकर व प्रतीक्षा पांगे उमरगा तालुक्यातील कन्या आहेत.

या उपक्रमासाठी महाविद्यालयातील ४० विद्यार्थ्यांनी सायबर योद्धा म्हणून काम केले.